BOOK-POST

"यशवंतराव चव्हाण भवन"
पुणे जिल्हा परिषद, शिक्षण विभाग,
जा.क्र. शिक्षण/माध्य/३४/अनुदान/९१-९२
पुणे-१. दिनांक :- १८.९.१९९१

प्रति, मुख्याध्यापक
अडवबाई नारायण दासजी दुगड
माध्यमिक विद्यालय कोंढवे खुर्द

विषय :- शासनमान्य विना अनुदानित पात्र माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त] अनुदान मंजूर करणे बाबत.

संदर्भ :- शासन पत्र क्रं. एसएसएन/१०९०/२३०६/माशि-१, दि.३१-१०-९०

उपरोक्त विषय व संदर्भ पत्रानुसार सोबत जोडलेल्या यादीतील माध्यमिक शाळा १ मार्च, १९९१ पासून मान्य तुकड्या व मान्य शिक्षक/शिक्षकेतर सेवक संख्येचे वेतन १००% अनुदानास पात्र समजण्यात येत आहे. तरी आपण १ मार्च, १९९१ पासून आपल्याकडे सेवेत असलेल्या शिक्षकव शिक्षकेतर कर्मचा-यांची नेमणूक मान्यता या कार्यालयाकडून घेऊन वेतन देयके वेतन पथकाकडे सादर करावीत. अद्यापही सेवक संख्या निश्चिती व नेमणूक मान्यता आपण घेतली नसेल तर तसे प्रस्ताव या कार्यालयास सादर करुन निश्चिती व नेमणूकांना मान्यता घ्यावी व त्यानंतर वेतन देयके वेतन पथकाकडे नियमित सादर करावीत.

सेवक संख्या निश्चिती करण्यासाठी सोबत जोडलेल्या यादीमध्ये आपल्या विद्यालयात मान्य असणा-या तसेच तुकड्यांचाच विचार केला जाईल. जर आपल्या विद्यालयास या संख्येपेक्षा जास्त तुकड्या या कार्यालयाकडून मंजूर करण्यात आल्या असल्या तरी त्या पूर्ण विना अनुदान तत्वावर राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

तरी कृपया वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन, वेतन देयके वेतन पथकाकडे त्वरीत सादर करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

स्थानीपर माउ शि.अ.
यांची स्वाक्षरी असे.

शिक्षणाधिकारी [माध्य]
जि.प.पुणे-१. करिता

प्रत :- अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, पुणे यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२/- संबंधित शाळांच्या वेतनावरील खर्च खाली दर्शविलेल्या लेखाशीर्षाखाली ९०-९१ या वर्षासाठी केलेल्या तरतुदीतून भागवावा.

१] बिगर आदिवासी उपयोजन क्षेत्रातील माध्यमिक शाळा

"२२०२ सर्व साधारण शिक्षण -०२ माध्यमिक ११० बिन सरकारी माध्यमिक शाळांना सहाय्य पंचवार्षिक योजनांतर्गत योजना [एक] बी, सर्वसाधारण माध्यमिक शाळांच्या विकासासाठी सहाय्यक अनुदान [ २२ ०२ ०४ ८७]" मागणी क्रं. ई-२.

मुख्याध्यापक

. . . २. .

२] आदिवासी उपयोजना क्षेत्रातील माध्यमिक शाळा.

"२२०२ सर्वसाधारण शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना – जनजाती क्षेत्र उपयोजना- ०२ माध्यमिक शिक्षण ११० अशासकीय माध्यमिक शाळांना सहाय्य [एच] राज्य योजनांतर्गत योजना [१] जनजाती क्षेत्रात अशासकीय माध्यमिक शाळा सुरु करणे, तसेच त्यांचा विकास व विस्तार करणे, सहाय्यक अनुदान/ अर्थ सहाय्य/ अनुदान [ २२ ०२ १८ ८६] मागणी क्रं. टी-८.

स्थळप्रतीवर मा.शि.अ.
यांच्या सही आहे.

शिक्षणाधिकारी [माध्य]
जि.प.पुणे-१. करिता

प्रत योग्य त्या माहितीसाठी सविनय सादर.
१] मा. शिक्षण संचालक, म.रा.पुणे-१.
२] मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१.

(२१)

१०० टक्के अनुदानपात्र माध्यमिक शाळांची यादी [सन १९९१-९२ पासून ]

| अ.क्र. | शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | इयत्ता | एकूण तुकड्या |
|---|---|---|---|---|
| १ | कै.गेनबा सोपान मोझे विद्यालय, येरवडा, पुणे" ६ [ पुणे म.न.पा.] | मराठी | ८ ते १० वी | ११ |
| २ | जडावबाई नारायण दासणी दुगड माध्यमिक विद्यालय, कोंढवे खुर्द. | मराठी | ८ ते १० वी | ०३ |
| ३ | सारोळे माध्यमिक विद्यालय, सारोळे ता.भोर. | मराठी | ८ ते १० वी | ०३ |
| ४ | शिंगेश्वर विद्यालय, बुडे बु.।। ता. खेड. | मराठी | ८ ते १० वी | ०३ |
| ५ | नवखंड माध्यमिक विद्यालय पारगांव, ता.आंबेगांव. | मराठी | ८ ते १० वी | ०३ |
| ६ | कै. रेऊबाई बाळाजी देवकर माध्यमिक विद्यालय, वडगांव आनंदर | मराठी | ८ ते १० वी | ०३ |
| ७ | जीवन विकास विद्यालय, पिंपळे खालसा, ता. शिरुर. | मराठी | ८ ते १० वी | ०३ |
| ८ | उर्दू माध्यमिक विद्यालय, आकुर्डी [पिंपरी-चिंचवड म.न.पा.] | उर्दू | ८ ते १० वी | ०३ |

स्थानप्रतीवर मा. शि.अ. यांची स्वाक्षरी आहे.

मुख्याध्यापिका

शिक्षणाधिकारी [माध्य]
जि.प.पुणे-१ करिता

कै. जडावबाई ना. दुगड माध्यमिक विद्यालय
कोंढवे खुर्द, पुणे - ४१२ ०४८.